RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष १, अंक ४०]  सोमवार, जून ८, २०१५/ज्येष्ठ १८ शके १९३७  [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ८३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जून २०१५

**अधिसूचना**

क्रमांक संकीर्ण. ११/२०१४/प्र.क्र.७९/अ-२.— विकास योजनेतील आरक्षणाखालील जागांसाठी राबविण्यात येणाऱ्या भूसंपादन प्रक्रियेसाठी नवीन भूसंपादन कायदा,२०१४ मधील नियम १४ मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध केल्याप्रमाणे जनतेला उपलब्ध करून देण्यात आलेल्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर उक्त नियमांचा मसुदा विचारात घेण्यात येईल.

२. अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये उक्त नियमांच्या मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही सूचना व हरकती प्राप्त होतील, त्या राज्य शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

३. हरकती वा सूचना कोणत्याही असल्यास, त्या उप सचिव (भूमिसंपादन), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे पाठविण्यात याव्यात.

ई-मेल : *landacquisition.a2@gmail.com*

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. कि. गावडे,**
शासनाचे उप सचिव.

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जून २०१५

## अधिसूचना

**भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

नस्तीचा क्रमांक संकिर्ण. ११/२०१४/प्र.क्र.७९/अ-२.— भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम १०९ ची पोट-कलमे (१) व (२) याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकेतचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्याचे योजिले आहे, पुढील नियमांचा मसुदा हा, त्यामुळे बाधा पोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम ११२ व्दारे आवश्यक असल्याप्रमाणे याव्दारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा, महाराष्ट्र शासन दिनांक ८ जुलै २०१५ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेईल.

२. उपरोक्त दिनांकापूर्वी, उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना उप सचिव (भूसंपादन), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

## नियमांचा मसुदा

(१) या नियमांना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

(२) भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ यांच्या नियम १४ मध्ये, उप-नियम (१) मध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

> " परंतु, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा ३७) याच्या तरतुदी अन्वये विकास योजनेतील राखीव क्षेत्राच्या संपादन प्रक्रियेमध्ये, नुकसान भरपाईची तीस टक्के रक्कम अधिनियमाच्या कलम १९ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी बिनव्याजी जमा करण्यात येईल, आणि उर्वरित रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये निवाडा प्रसिद्ध करण्यापूर्वी जमा करण्यात येईल आणि नुकसान भरपाईची अशी रक्कम जमा करण्यात आल्याच्या अभावी अधिनियमाच्या अनुक्रमे कलम १९ व २३ अन्वये कोणतीही घोषणा करण्यात येणार नाही व निवाडा देण्यात येणार नाही.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. कि. गावडे,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 8th June 2015

*NOTIFICATION*

No. Mis.11/2014/C.R.79/A-2.— The following draft of rules further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of section109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), for the information of all persons likely to be affected there by ; and notice is hereby given that the said draft rules shall be taken into consideration after the expiry of a period of thirty days from the date on which the copies of this notification as published in the *Maharashtra Government Gazette* are made available to the public ;

2. Any objection or suggestion which may be received from any person with respect to the said draft rules within the period so specified shall be considered by the State Government ;

3. Objections or suggestions, if any, may be sent to the Deputy Secretary (Land Acquisition), Department of Revenue and Forest, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032.

E-mail ID is : *landacquisition.a2@gmail.com*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Deputy Secretary to Government.

**REVENUE AND FOREST DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 8th June 2015

*NOTIFICATION*

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. Mis.11/2014/C.R.79/A-2.— The following draft of rules further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of section109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), and of all other powers enabling it in this behalf, is hereby published, as required by section 112 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 8th day of July, 2015.

2. Any objections or suggestions which may be received by the Deputy Secretary, Revenue and Forest Department, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on before the aforesaid date will be taken considered by the Government.

*DRAFT RULES*

(1) These rules may called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (Amendment) Rules, 2014.

(2) In rule 14 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, in sub-rule (1), the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, in acquisition process of the reserved places in development plan under the provisions of the Maharashtra Regional Town Planning Act, 1966 (37 of 1966), thirty percent of the compensation amount shall be deposited, without interest, before the publication of the notification under section 19 of the Act, and the remaining amount shall be deposited before the publication of the award in the Collector Office, and no declaration and award shall be made under section 19 and 23 of the Act, respectively, in the absence of such deposit of the amount of compensation.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.